ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २६ जून, १९५७ | अंक २६

## विविध माहिती

**जीवसृष्टीच्या प्रारंभाविषयीं परिषद्**—जीवसृष्टीच्या उगमासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठी जीवशास्त्रज्ञांची एक परिषद् येत्या ऑगस्ट महिन्यांत मॉस्को येथें भरणार आहे. परिषदेस १२ राष्ट्रांचे प्रतिनिधी येणार आहेत. कलकत्ता विद्यापीठाचे डॉ. गुह ह्यांना आमंत्रण आलें आहे.

**इन्फ्ल्यूएंझाची भीति**—दूर पूर्वेकडील देश व अमेरिका ह्यांच्यांतील दळणवळण मोठ्या प्रमाणावर असल्यानें त्या भागांतील तापाची साथ अमेरिकेंत पसरण्याची भीति उत्पन्न झाली आहे. अमेरिकेंतील शास्त्रज्ञांनीं रोगजंतूंचा प्रतिकार करण्याची लस तयार केली आहे, अशी वार्ता आहे.

**बेकारांसाठी कामें**—उत्तर प्रदेश सरकारचें बांधकामखातें १३ मोठे पूल व ३२ रस्ते सध्या बांधत आहे. ह्या सर्व कामांना मिळून ३ कोटी रु. पेक्षा अधिक खर्च येईल. भारत सरकारनें बेकारांना रोजगार देण्यासाठी ज्या योजना आखल्या आहेत त्यांना अनुसरून हीं कामें काढण्यांत आलेलीं आहेत. कामांना लागणारी रक्कम भारत सरकारनें कर्जाऊ दिलेली आहे.

**विटा तयार करण्याचें यंत्र**—रुरकी येथील बांधकामाच्या संशोधनसंस्थेनें विटा तयार करण्याचें एक यंत्र तयार केलें आहे. यंत्र चालविण्यासाठी ४ माणसें लागतात व त्याच्या साहाय्यानें दररोज २,००० विटा तयार होऊं शकतात. यंत्राच्या साह्यानें तयार झालेल्या विटा एकसारख्या आकाराच्या असतात.

**पंडित नेहरूंना स्कूटर**—डेन्मार्कमधील एका कारखानदारानें पं. नेहरूंना निळ्या रंगाची व हलक्या वजनाची एक स्कूटर भेटीदाखल दिली आहे. पंडित नेहरू आपल्या बंगल्याच्या आवारांत स्कूटरवर बसण्याचा प्रयत्न करीत असल्याचे फोटो पाहून कारखानदारानें ही भेट देण्याचें ठरविलें.

**आगपेट्यांसाठी लागणारें लांकूड**—मुंबई राज्यांत आगपेट्या तयार करण्यासाठी लागणारें लांकूड पुरेसें उपलब्ध होत नाहीं. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारनें अशा प्रकारच्या झाडांची लागवड करण्याचें ठरविलें आहे. लागवडीची योजना पुरी होण्यास पांच वर्षांत ४,३३,००० रुपये खर्च येणार आहे. मूळ योजना १९५५ सालीं हातीं घेण्यांत आली आहे.

**पेकिंग येथील दूरदर्शन केंद्र**—पेकिंग येथें चिनी सरकारनें दूरदर्शन केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रासाठी लागणारी १,३१२ फूट उंचीची डोलकाठी मॉस्को येथें तयार करण्यांत येत आहे. फ्रान्समधील सुप्रसिद्ध इफेल मनोऱ्यापेक्षा ही डोलकाठी ३२८ फूट अधिक उंचीची होईल.

**शाळेच्या इमारतीसाठी सहकार्य**—गुजरातमधील महिसा नांवाच्या खेड्यांत शाळेची एक नवीन इमारत बांधण्यांत आली आहे. इमारतीसाठी ४७,००० रुपये खर्च आला असून ती १२ वर्ग चालण्याइतकी मोठी आहे. शाळेसाठी लागणाऱ्या निधीपैकी २१,५०० रुपयांची रक्कम गांवकऱ्यांनीं जमविली व बाकीची सरकारनें दिली.

**कोसी योजनेवरील कर्ज**—कोसी नदीवर बांधण्यांत येत असलेल्या धरणाच्या योजनेवर मार्च १९५७ अखेर ७·५० कोटी रुपये खर्च झाले आहेत. सर्व योजना पुरी होण्यास ४५·९२ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. योजना पूर्ण झाल्यावर ७१७ चौरस मैल टापूचें पुरापासून संरक्षण होईल व १४ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल.

**कर गोळा करणाऱ्यांना उपदेश**—भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं प्राप्तीकर खात्याच्या अधिकाऱ्यांना असा उपदेश केला कीं, त्यांनीं लोकांशीं चांगले संबंध ठेवावे. त्याशिवाय कर गोळा करणें कठीण जाईल. त्यांनीं आपलें काम तळमळीनें करावें. कारण, कराच्या रूपानें गोळा झालेला पैसा देशाच्या विकासासाठीं खर्च करण्यांत येणार आहे.

**खांडवा–हिंगोली रेल्वेमार्ग**—खांडवा–हिंगोली ह्या नव्या रेल्वेमार्गावरील १८ मैल रस्त्याचें उद्घाटन करण्यांत आलें. सर्व मार्ग पुरा झाल्यावर भारतामधील अरुंद रुळावर चालणारे उत्तर व दक्षिण भारतामधील मार्ग जोडले जातील.

**ब्रिटनच्या अणुभट्ट्यांचा अभ्यास**—भारताच्या अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा हे ब्रिटनमधील अणुभट्ट्यांची व अणुसंशोधनकेंद्रांची पहाणी करण्यासाठी ब्रिटनला गेले आहेत. बेलग्रेड येथें भरलेल्या वर्ल्ड पॉवर कॉन्फरन्ससाठी ते युगोस्लाव्हिआलाहि गेले होते.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# BANK OF

## Balance Sheet as

| 1955 | CAPITAL & LIABILITIES | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 50,00,000 | 50,000 Shares of Rs. 100/- each. ... | 50,00,000 0 0 | |
| | *Issued Capital:* | | |
| 25,00,000 | 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000 0 0 | |
| | *Subscribed Capital:* | | |
| 25,00,000 | 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000 0 0 | |
| 12,50,000 | Amount called up at Rs. 50/-per share. ... | 12,50,000 0 0 | |
| | Less Calls Unpaid ... | Nil | |
| | Add Forfeited Shares ... | Nil | 12,50,000 0 0 |
| 34,500 | **2. Reserve Fund & Other Reserves** ... | | 34,500 0 0 |
| | **3. Deposits and Other Accounts** | | |
| 3,71,356 | Fixed Deposits ... | 3,95,378 10 0 | |
| 5,91,396 | Savings Bank Deposits ... | 6,52,251 5 8 | |
| 5,38,320 | Current Accounts and Contingency Accounts, etc. ... | 5,14,612 11 10 | 15,62,242 11 6 |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| 32,023 | (1) In India ... | 1,24,616 1 3 | |
| | (2) Outside India ... | Nil | 1,24,616 1 3 |
| | *Particulars:* | | |
| | (1) Secured 1,24,616 1 3 | | |
| | (2) Unsecured Nil | | |
| 1,289 | **5. Bills Payable** ... | | 3,425 0 0 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable (As per contra)** | | |
| 89,283 | (1) Payable in India ... | 98,736 15 9 | |
| | (2) Payable outside India ... | Nil | 98,736 15 9 |
| | **7. Other Liabilities** ... | | |
| 1,806 | (1) Provision for Income tax ... | 1,806 3 0 | |
| 1,815 | (2) Branch Adjustment ... | 4,405 13 0 | |
| 703 | (3) Outstanding Liabilities for Expenses ... | 509 15 0 | |
| 230 | (4) Income received in advance ... | 263 9 0 | 6,985 8 0 |
| | Carried over ... | | 30,80,506 4 6 |

# POONA, LIMITED

**at 31st December, 1956**

| 1955 | PROPERTY & ASSETS | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 2,72,962 | In hand and with Reserve Bank and State Bank (including foreign currency notes) ... | | 3,54,176 4 9 |
| | **2. Balances with other Banks (On Current Accounts):** | | |
| 1,04,483 | (1) In India ... | 1,53,476 0 10 | |
| | (2) Outside India ... | Nil | 1,53,476 0 10 |
| Nil | **3. Money at Call and Short Notice** ... | | Nil |
| | **4. Investments (At Book Value)** | | |
| 5,99,202 | (1) Securities of the Central and State Governments and other trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments of the face value of Rs. 6,01,300 0 0 (Market value Rs. 5,59,476 10 0) ... | 5,99,202 4 0 | |
| 6,069 | (2) Shares: Ordinary fully paid (Market value Rs. 4,498 12 6) ... | 6,069 8 6 | |
| | Partly paid ... | Nil | |
| | Deferred fully paid ... | Nil | |
| | (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| | (4) Other investments ... | Nil | |
| 6,05,271 | (5) Gold ... | Nil | 6,05,271 12 6 |
| | (Government Securities of the face value of Rs. 6,00,000/- are lodged with Banks for advance facilities) | | |
| | **5. Advances : Other than Bad and Doubtful Debts** for which provision has been made to the satisfaction of the auditors subjects to particulars under clause (4) below : | | |
| | (1) *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* | | |
| 17,13,475 | (1) In India ... | 17,12,456 8 9 | |
| | (2) Outside India ... | Nil | |
| | (2) *Bills, Discounted and Purchased* (excluding treasury bills of the Central and State Governments): | | |
| 4,112 | (1) Payable in India 2,434 13 0 | | |
| | (2) Payable outside India Nil | 2,434 13 0 | 17,14,891 5 9 |
| | **Particulars of Advances:** | | |
| 10,64,121 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 10,73,215 10 1 | |
| 3,53,813 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 3,25,505 9 3 | |
| Nil | (3) Debts considered good, secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | Nil | |
| 2,99,653 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. | 3,16,170 2 5 | |
| 17,17,587 | | 17,14,891 5 9 | |
| 41,072 | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company, or any of them either severally or jointly with any other persons ... | 42,535 4 0 | |
| 6,099 | (6) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members ... | 18,893 10 8 | |
| 1,50,161 | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | 42,535 4 0 | |
| 2,25,470 | (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case of private companies, as members ... | 58 568 3 8 | |
| | Carried over ... | | 28,27,815 7 10 |

# BANK OF

## Balance Sheet as

| 1955 | CAPITAL & LIABILITIES | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | Brought over ... | | 30,80,506 4 6 |
| Nil | 8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra ... | | Nil |
| | 10. Contingent Liabilities NIL | | |
| | Total Rs. | | 30,80,506 4 6 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1956

| 1955 | EXPENDITURE | Rs. As.Ps. | 1955 | INCOME : (Less Provision Made during the year for Bad and doubtful debts & other useful or necessary provisions) | Rs. As.Ps. |
|---|---|---|---|---|---|
| 32,979 | To Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | 33,511 5 9 | 81,979 | By Interest and Discount ... | 72,577 11 3 |
| | To Salaries and Allowances and Provident Fund; | | 4,571 | By Commission, Exchange, and Brokerage ... | 4,587 13 0 |
| | (1) Manager 6,950 0 0 | | Nil | By Rents ... | Nil |
| 43,021 | (2) Staff 36,329 5 0 | 43,279 5 0 | | | |
| Nil | To Directors' and Local Committee Members' Fees and allowances ... | Nil | Nil | By Net Profit on sale of investments, gold & silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account) ... | Nil |
| 7,918 | To Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 8,515 5 0 | | | |
| 8,569 | To Law Charges ... | 2,004 13 0 | | | |
| 3,171 | To Postage, Telegrams, and Stamps ... | 3,197 5 1 | | | |
| 1,000 | To Auditors' Fees ... | 1,000 0 0 | Nil | By Net Profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or to any particular fund or account) ... | Nil |
| 2,562 | To Depreciation on and repairs to the Banking company's Property ... | 2,282 7 0 | 560 | By Income from Non-Banking assets, and profit from sale of or dealing with such assets ... | 505 0 0 |
| 3,294 | To Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 5,462 3 3 | 2,965 | By Other receipts ... | 3,133 15 6 |
| Nil | To Loss from sale of or dealing with Non-Banking Assets ... | Nil | 16,894 | By Net Loss for the Year ... | 22,424 15 4 |
| 4,455 | To Other Expenditure ... | 3,976 11 0 | | | |
| | Total Rs. ... | 1,03,229 7 1 | | Total Rs. ... | 1,03,229 7 1 |

### REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

(See next page)

We have audited the foregoing Balance Sheet of the Bank of Poona Limited, as at 31st December, 1956 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the audited returns of all Branches of the Bank.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227(5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The accounts are, therefore drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

# POONA, LIMITED

## at 31st December 1956

| 1955 | PROPERTY & ASSETS | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 28,27,815 7 10 |
| Nil | (9) Due from Banking Companies ... (A Claim for Rs. 25,000/- has been made with an Insurance Company against fidelity insurance policy issued by it for equal amount included in doubtful or bad debts.) | Nil | |
| | **6. Bills Receivable, Being Bills For Collection as per contra:** | | |
| 89,283 | (1) Payable in India ... | 98,736 15 9 | |
| | (2) Payable outside India ... | Nil | 98,736 15 9 |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra** | | Nil |
| Nil | **8. Premises Less Depreciation** ... | | Nil |
| | **9. Furniture and Fixtures Less Depreciation** ... | | |
| | At Cost as per last Balance Sheet ... | 50,707 0 9 | |
| | Additions during the year ... | 91 6 0 | |
| | | 50,798 6 9 | |
| | Less Depreciation upto 31-12-1955 18,261 0 9 | | |
| 32,446 | For the year 1,953 6 0 | 20,214 6 9 | 30,584 0 0 |
| | **10. Other Assets Including Silver** ... | | |
| 19,000 | 1. Land at cost ... | 19,000 0 0 | |
| | 2. Vehicle (depreciated cost) 509 0 0 | | |
| | Less Depreciation for the year | | |
| 509 | ending 31-12-56 102 0 0 | 407 0 0 | |
| 2,004 | 3. Stationery Stock ... | 1,388 0 0 | |
| 245 | 4. Stamps ... | 109 11 0 | |
| 5,675 | 5. Interest accrued on Investments ... | 5,675 5 0 | |
| 8,420 | 6. Tax deducted at source ... | 12,629 14 0 | |
| 426 | 7. Prepaid Expenses ... | 221 12 0 | |
| 163 | 8. Income due but not received ... | 158 12 0 | |
| 36,442 | 9. Advances for expenses ... | 7,105 9 0 | 46,695 15 0 |
| 37,988 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims (Market Value.)** ... | | 37,988 0 0 |
| | **12. Profit and Loss Account:** | | |
| | Balance of Loss of Last year ... | 16,260 14 7 | |
| | Add Balance of Loss this year ... | 22,424 15 4 | 38,685 13 11 |
| | | Total Rs.... | 30,80,506 4 6 |

**D. R. Naik** *Chairman*

N. B. Parulekar, F. P. Pocha, G. K. Naik — *Directors*

**K. D. Joglekar** *Accountant*

**G. G. Sathe** *Manager*

We report that :— (*See Previous Page*)

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns; (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet read along with the notes appearing there on, gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1956 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the loss for the year ended upon that date.

**P. G. Bhagwat**
Chartered Accountants.

20th March, 1957

# न्यूयॉर्कमधील महाराष्ट्रीय पति-पत्नी व्यापारी

श्री. शं. कृ. व सौ. इंदुताई मराठे

( श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांनीं घेतलेल्या मुलाखतीवरून )

श्री. शंकरराव मराठे यांचें स्वतःचें टुमदार घर अॅस्टोरिया-लाँग आयलंड या न्यूयॉर्कच्या उपनगरांत एकविसाव्या रस्त्यावर आहे. श्री. मराठे यांनीं सायंकाळीं आपल्या लहानशाच पण उत्फुल्ल गुलाबोद्यानांत आम्हांला आम्रोपहार दिला. घराच्या मागल्या अंगणांत त्यांनीं गुलाब आणि द्राक्षें, अंजीर, डाळिंब, इत्यादि फळझाडें यांचा सुंदर बगीच्या केलेला आहे. बागाईत हा त्यांचा शौक आहे; व दुकानाव्यतिरिक्त त्यांचा बहुतेक वेळ बगीचाची मशागत करण्यांत जातो. सायंकाळीं चारच्या सुमारास आम्ही त्यांच्या बगीच्यांत गेलों, त्यावेळीं त्यांनीं टपोऱ्या लाल गुलाबांनीं बहारलेले वेल आम्हांला मोठ्या अभिमानानें दाखवले. ते आणि सौ. इंदुताई अशीं दोघेंहि दुकानांत काम करतात. श्री. शंकरराव हे पांचव्या अॅव्हेन्यूतील ठोक व्यापाराचें बडें दुकान सांभाळतात, तर रॉकफेलर सटरमधील चिल्लर दुकान सौ. इंदुताई पहातात. पण दोघेंहि जशीं धंद्यांत हुशार, तशींच कलाप्रियहि आहेत. श्री. शंकरराव हे बगीच्याचे शौकी आहेत, तर सौ. इंदुताई या चित्रकला आणि काव्यकला यांच्या व्यासंगी आहेत. त्यादिवशीं त्यांनीं चहाबरोबर फ्लॉरिडाहून आणवलेल्या अमेरिकन आंब्यांचा लाभ आम्हांला दिला.

अमेरिकन आंबा हा दिसावयाला आपल्याकडील पायरीच्या आंब्यासारखा गरगरीत, रंगदार पण अमेरिकन अननासारखाच बेचव आहे. पण, त्या निमित्तानें मराठे कुटुंबाचा निकट परिचय आम्हांला झाला, हें या उपहाराचें खरें स्वारस्य !

" या शहरांत गुजराती, मारवाडी, सिंधी, शीख, इत्यादि अनेक बडे हिंदी व्यापारी आहेत. त्यांच्या मानानें मी खरोखरी एक सामान्य दुकानदार, एक अगदीं लहानसा व्यापारी ! मात्र महाराष्ट्रीय व्यापारी असा फक्त मी एकटा एकच ! सदतीस वर्षांपूर्वी मॅट्रिकपर्यंत शिकलेला असा अनाथ विद्यार्थीगृहांतला मी तरुण मुलगा-फक्त ५० डॉलर म्हणजे त्या वेळच्या चलनाप्रमाणें सुमारें १५० रुपये बरोबर घेऊन या देशांत आलों. आज या शहरांत 'होलसेल' आणि 'रिटेल' अशीं माझीं दोन प्रकारचीं दुकानें आहेत. १९३३ सालीं 'रॉकफेलर सेंटर' जेव्हां येथें स्थापन झाला, तेव्हां त्या सेंटरमध्यें प्रत्येक राष्ट्राचें एक दुकान असावें, अशी रॉकफेलर मंडळीची कल्पना होती. त्यांनीं मला आग्रहानें बोलावून आपल्या सेंटरमध्यें दुकान काढावयाला लावलें, हें मी विशेष समजतों भांडवल मजजवळ पूर्वी फारसें नव्हतें, आजहि नाहीं. पण चिकाटी आणि परिश्रम यांच्या जोरावर मी जगांतल्या या अत्यंत धनाढ्य शहराच्या बाजारपेठेंत माझा जम बसवला. हिंदुस्थानांत माणसांची बेसुमार गर्दी झालेली आहे. त्या गर्दीतून एक माणूस बाहेर पडला, परदेशांत गेला आणि स्वतःचें नशीब काढूं शकला, एवढेंच काय तें माझें वैशिष्ट्य ! " अशी माहिती श्री. मराठे ह्यांनीं दिली.

आपल्या मनांत अमेरिकेंत जाण्याची कल्पना कशी आली, हें सांगतांना श्री. शंकरराव मराठे म्हणाले, " पहिलें महायुद्ध चालू असतांना मी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकत होतों. अमेरिकेचे त्या वेळचे जमद्विख्यात अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनीं उद्घोषिलेलीं चौदा तत्त्वें माझ्या वाचनांत आलीं; व वसाहतवादाचा ( Colonialism ) नाश करून जगाचा उद्धार हाच एक देश करूं शकेल, असा भाव माझ्या मनांत उत्पन्न झाला. त्या श्रद्धेमुळें मी अमेरिकेंत जाण्याचें ठरविलें. त्या श्रद्धेच्या भरांत प्रेसिडेंट विल्सन यांना मी एक अभिनंदनाचें पत्रहि तेव्हां पाठवलें होतें ! पण अमेरिकेंत जाण्याचा संकल्प अंमलांत आणणें सोपें नव्हतें. त्यांतच माझे थोरले बंधु वारल्यामुळें कुटुंबाची जबाबदारीहि मजवर पडली. म्हणूनच दोन वर्षें मी पोस्टांत नोकरी केली. १९२० च्या मेमध्यें मीं अमेरिकेला जाण्याच्या तयारीला लागलों. माझ्याविषयीं कळकळ असलेल्या व्यक्तींच्या मदतीनें दोन हजार रुपये जमवले; व ता. ५ डिसेंबर १९२० रोजीं बोटींत पाय ठेवला. वाटेंत जपानमध्यें दोन आठवडे राहून तेथील परिस्थिति पाहिली; व ता. १ फेब्रुवारी १९२१ रोजीं सान्फ्रान्सिस्को येथें उतरलों. पहिला विचार अर्धवट राहिलेलें शिक्षण पूर्ण करण्याचा होता, म्हणून कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटींत दाखल झालों. पण जवळची पुंजी प्रवासांत संपून गेली होती. त्यामुळें शिक्षण सोडून देऊन एक वर्ष शेतावर मजुरी केली. शेतमजुरींत दोन प्रकारचे फायदे होते; अजूनहि आहेत. एक तर रहाण्याची जागा फुकट आणि दुसरें अन्न मुबलक; तसेंच स्वस्त ! त्या शेतावर मुख्य भरणा शीख कामगारांचा होता. त्यांच्या मानानें मी अगदींच किरकोळ आणि बुटका ! शेतांतल्या नाल्या खोदतांना माझ्या हातांना फोड आले; व बरोबरच्या शीख कामगारांच्या मानानें माझ्या कामाचा उरक कमी पडला. त्यामुळें कंपनीच्या सुपरिंटेंडेंटची नजर मजकडे जाऊन त्यानें मला हटकलें. मी त्याला वस्तुस्थिति सांगितली, तेव्हां त्यानें मोठ्या सहानुभूतीनें मला रोज २-२॥ तास हिशेबाचें काम शेतकामाच्या जोडीला दिलें. अशा रीतीनें एका वर्षांत मी १,२०० डॉलर साठवले; व मग नॉर्थ कॅरोलायना ( North Carolina ) राज्यांतील रॅले या राजधानीच्या शहरीं असलेल्या युनिव्हर्सिटींत दाखल झालों. या युनिव्हर्सिटींतूनच १९२५ सालीं मी बी. ए. झालों. "

## व्यापारी जीवनाचा प्रारंभ

युनिव्हर्सिटींतील या आपल्या चार वर्षांच्या काळाचा जो वृत्तांत श्री. मराठे यांनीं सांगितला, तोहि मोठा बोधप्रद आहे. ते म्हणाले, " शेतावर कार्य करून जे १,२०० डॉलर मी सांठवले होते, ते फक्त फीपुरतेच होते ! त्यामुळें पोटासाठीं मला अभ्यास करून दुसरें काम करणें भाग पडलें. म्हणून रॅले येथें प. वा. जोसेफस डॅनियल्स यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'रॅले न्यूज अँड ऑब्झर्वर' या दैनिकाच्या अंकविक्रीचें काम मी घेतलें. या दैनिकांतील सणसणीत लेखांमुळें कांहीं लोक त्याला कुचाळीनें 'रॅले न्यूज अँड डिस्टर्बर' असें म्हणत असत ! रोज सकाळीं ६ ते ७॥ मी अंक वाटींत असे. या वर्तमानपत्राची आठवड्याची वर्गणी वीस सेंट होती. ती वसूल करण्याची जबाबदारीहि मजवरच होती. वीस सेंट्समधले आठ सेंट्स मला मिळत असत. सुमारें २०० ते २५० वर्गणीदार उच्च मध्यम वर्गांतले होते. त्यामुळें आठवड्याला मला १६ ते २० डॉलर मिळत. मात्र वर्षाचे ३६५ दिवस, एकहि सुटी न घेतां, मला हें काम सतत चार वर्षें करावें लागलें ! सामान्यतः येथील वर्तमानपत्रें विकणारे मुलगे नाताळांत आपल्या गिऱ्हाइकांकडे इनाम मागावयाला जातात. पण मी मात्र कधींहि गेलों नाहीं. पण माझ्या गिऱ्हाइकांतले कांहीं सज्जन 'ऑब्झर्वर' च्या कचेरींत माझ्यासाठीं नाताळाच्या देणग्या पाठवीत. त्यांच्या देणग्यांचे ते ७०-७५ डॉलर मला वर्षाला जादा मिळत ! या गिऱ्हाइकांशीं माझा जो

( पृष्ठ २१२ वर चालू )

# अर्थ

बुधवार, ता. १९ जून, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम व पाश्चात्य राष्ट्रें

लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'दि फिनॅन्शिअल टाइम्स' ह्या वृत्तपत्रानें भारताचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम व देशांतील आर्थिक परिस्थिति ह्यासंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. पंतप्रधान श्री. नेहरू कॉमनवेल्थ राष्ट्रगटाच्या पंतप्रधानांच्या परिषदेला हजर रहाण्यासाठी ब्रिटनला गेले आहेत. ह्याच सुमारास आर्थिक प्रश्नांचा विचार करणाऱ्या ह्या पत्रानें भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं विवेचन करावें, हें सूचक मानण्यास हरकत नाहीं. पंतप्रधानांच्या परिषदेंत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील परस्पर आर्थिक संबंधांविषयीं चर्चा होणें अपरिहार्यच आहे.

'फिनॅन्शिअल टाइम्स' नें आपल्या संपादकीय लेखांत व्यक्त केलेल्या विचारांचा आशय असा आहे. भारताचा पंचवार्षिक आर्थिक कार्यक्रम यशस्वी होणें ही मोष्ट पाश्चात्य देशांच्या दृष्टीनें सुद्धां महत्त्वाची आहे. पंतप्रधान श्री. नेहरू कॉमनवेल्थ राष्ट्रगटाच्या पंतप्रधानांच्या परिषदेसाठी लंडनला आले आहेत. ह्याच वेळीं तिकडे भारतांत आर्थिक दुरावस्थेची परमावधि झालेली आहे. अशी दैना भारत स्वतंत्र झाल्यापासून कधींच उडालेली नाहीं. पौंडी गंगाजळीच्या पातळीबद्दल भारत व ब्रिटन ह्यांच्यामध्यें एक करार आहे. ह्या करारांतील अटीप्रमाणें भारताला किमान ३० कोटी पौंडाची गंगाजळी ठेवणें भाग आहे. तथापि हा करार चालू महिनाअखेर संपत आहे. असें असलें तरी भारत सरकारला पौंडी गंगाजळीची पातळी ह्या मर्यादेच्या खालीं जाऊ देणें इष्ट वाटत नाहीं. एका वर्षाहून थोड्या अधिक अवधींतच भारताची पौंडी गंगाजळी निम्म्यावर आली आहे. परदेशांत करण्यांत येणारा भांडवली खर्च ह्याच वेगानें चालू राहिला तर हा निधि लवकरच संपुष्टांत येईल आणि जवळ तीनचतुर्थांश पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्याचें शिल्लकच राहील. भारत सरकारला आपल्या रुपयावरील विश्वास जर टिकवून धरावयाचा असेल तर पौंडी गंगाजळीला लागलेली ओहोटी लवकरांत लवकर थांबविणें जरूर आहे; आणि हें कार्य करण्याची वेळ अद्याप गेलेली नाहीं.

भारतापुढें असलेल्या अडचणींपैकीं कांहीं अडचणी अंतर्गत आहेत. गेल्या वर्षापासून चलनवृद्धीवर असलेला सरकारचा ताबा सुटत चाललेला आहे. देशांतील मालाच्या घाऊक किंमतींत २० टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं गेल्या महिन्यांत सरकारचें अंदाजपत्रक सादर केलें. अंदाजपत्रकांत जवळ जवळ ८ कोटी पौंडांची नवी करवाढ सुचविण्यांत आली आहे. त्यामुळें देशांतर्गत खर्चांत बरीच कपात होण्यास मदत होईल हें मात्र खरें. त्याचप्रमाणें आयातीचे परवाने देण्याबाबतहि अधिक काटकसरीचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. प्रेसिडेंट आयसेनहोअर ह्यांनीं ५० कोटी डॉलर्सचा विकास-फंड उभारण्याची शिफारस अमेरिकन कॉंग्रेसला केली आहे. कॉंग्रेसकडून ह्या शिफारशीला बहुतकरून अनुमोदन मिळेल. तसें झालें तर अमेरिकन सरकार भारताला द्यावयाच्या मदतींत वाढ करण्याची शक्यता आहे.

## बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना

भारताचें सरकार बोटी बांधण्याचा दुसरा एक कारखाना उभारण्याच्या खटपटींत आहे. अशा प्रकारचा कारखाना बांधण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें कोलंबो मदत योजनेप्रमाणें तांत्रिक मदत देऊं केली आहे. संकल्पित कारखाना कोठें उभारण्यांत यावा तें ठरविण्यासाठीं ब्रिटिश तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. ह्या मंडळाची प्राथमिक पहाणी पुरी झाल्यावर येत्या सप्टेंबर महिन्यांत आणखी एक मंडळ येईल, आणि तें कारखान्याच्या योजनेचा तपशीलवार अहवाल सरकारला सादर करील. दुसरा कारखाना उभारण्यांत आल्यावर त्यांत तेलवाहू बोटी व १०,००० टनांपेक्षा अधिक वजनाच्या बोटी बांधण्याचा सरकारचा विचार आहे. कारण, अशा प्रकारच्या बोटींची सध्यां विशेष गरज आहे. १०,००० टनांपेक्षा कमी वजन असलेल्या बोटी विझगापट्टम येथील कारखान्यांत सध्यांच बांधण्यांत येत आहेत. भारतीय संघराज्यांतील समुद्रकांठ असलेल्या निरनिराळया राज्यांकडून नवा कारखाना आपल्या हद्दींत काढण्यांत यावा, अशी मागणी करण्यांत येत आहे. म्हैसूर राज्यांतील भटकळ, केरळ राज्यांतील कोचीन, ओरिसामधील परदीप व पश्चिम बंगालमधील कलकत्ता इतकीं ठिकाणें कारखान्यासाठीं सुचविण्यांत येत आहेत. भारताची दर्यावर्दी वहातूक वाढविण्यासाठीं परदेशांतील बोट बांधण्याच्या कारखान्यांतून, उशिरा किंमत देण्याच्या अटीवर, बोटी बांधवून घेतां येणें शक्य आहे काय, ह्यासंबंधींहि विचार चालू आहे.

## मँगेनीझच्या निर्यातीचा व्यापार

मँगेनीझ हें खनिज निर्यात करून भारताला परदेशीय हुंडणावळीचा लाभ होतो. पण ह्या निर्यात व्यापाराची परिस्थिति बिघडली असून ती सुधारण्यासाठीं भारत सरकारनें योग्य ते उपाय योजावे अशी मागणी विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यांत आली आहे. चेंबरनें सरकारच्या व्यापार व उद्योगखात्याकडे एक निवेदन पाठविलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, अलीकडे मँगेनीझच्या निर्यातीला परदेशांच्या स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. दक्षिण अमेरिका, दक्षिण आफ्रिका, घाणा, ईजिप्त, ट्युनिशिआ व रशिआ ह्या देशांकडून ही स्पर्धा करण्यांत येत आहे. अशा परिस्थितींत मँगेनीझच्या निर्यात व्यापार टिकविण्यासाठीं व वाढविण्यासाठीं भारत सरकारनें आपलें धोरण स्पष्ट केलें पाहिजे. तसें झाल्यास भारतामधील व्यापाऱ्यांना दीर्घ मुदतीचे करार करतां येतील व व्यापारांत स्थैर्य निर्माण करतां येईल. ह्या प्रश्नाचा विचार करतांना निर्यातीवर घेण्यांत येणाऱ्या कराचाहि पूर्ण विचार करण्यांत आला पाहिजे. कांहीं विवक्षित काळ जाईपर्यंत ह्या करांत वाढ करण्यांत येणार नाहीं असें आश्वासन सरकारकडून मिळणें आवश्यक आहे. सरकारनें स्थापन केलेल्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें ह्या व्यापारांत पूर्वी अनुभव न आलेल्या अडचणी मात्र निर्माण केल्या आहेत. ह्या खनिजाच्या निर्यातीला पूरक होतील असे उपाय कॉर्पोरेशनकडून अपेक्षित होते. पण प्रत्यक्ष व्यवहारांत कॉर्पोरेशन निर्यातीचा मक्ताच आपणाकडे घेत असल्याचा अनुभव येत आहे.

# The Presidency Industrial

## Balance Sheet as at

| CAPITAL AND LIABILITIES | Rs. as. ps. | Rs. as. ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| *Authorised Capital* | | |
| 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000 0 0 |
| **Issued Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000 0 0 |
| **Subscribed and Paid up Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 100 each Rs. 75 per Share called up ... | 7,50,000 0 0 | |
| Less 259 Shares forfeited ... | 19,425 0 0 | |
| 9,741 | 7,30,575 0 0 | |
| Less Calls unpaid ... | 9,750 0 0 | |
| | 7,20,825 0 0 | |
| Add: Forfeited Shares ... | 9,665 0 0 | 7,30,490 0 0 |
| | 7,30,490 0 0 | |
| **1A. Calls Received in Advance** ... | | 20,750 0 0 |
| **2. Reserve Fund and Other Reserves** ... | | 2,79,160 7 2 |
| **3. Deposits and Other Accounts** | | |
| (1) Fixed Deposits ... | 13,72,357 8 0 | |
| (2) Savings Bank Deposits ... | 12,02,998 5 5 | |
| (3) Current Deposits and Contingency Accounts, etc. ... | 9,78,176 12 1 | 35,53,532 9 6 |
| **4. Borrowings from other Banking Companies' Agents, etc.** | | |
| (1) In India ... | 12,30,019 4 3 | |
| (2) Outside India ... | 0 0 0 | 12,30,019 4 3 |
| **Particulars—** | | |
| (i) Secured by part of Banking Company's Investments ... | 12,30,019 4 3 | |
| (ii) Unsecured ... | 0 0 0 | |
| **5. Bills Payable** | | 10,961 4 3 |
| **6. Bills for collection (Being bills receivable as per contra)** | | |
| (i) Payable in India ... | 58,460 5 0 | |
| (ii) Payable outside India ... | 0 0 0 | 58,460 5 0 |
| **7. Other Liabilities** ... | | 78,197 2 4 |
| **8. Acceptances, Endorsements & other obligations as per contra** | | 0 0 0 |
| Contingent Liability: There is a claim for Rs. 7,634-1-3 against the Bank which is not acknowledged as a debt. | | |
| Total Rs. ... | | 59,61,571 0 6 |

# Bank, Limited, Poona 2.

**31st December 1956.**

| PROPERTY AND ASSETS | Rs. as. ps. | Rs. as. ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand, with Reserve Bank and State Bank of India ... | | 5,26,001 7 2 |
| **2. Balances with other Banks (in Current Account):—** | | |
| (i) In India ... | 46,261 3 10 | |
| (ii) Outside India ... | 0 0 0 | 46,261 3 10 |
| **3. Money at Call and Short Notice** ... | | 0 0 0 |
| **4. Investments at Cost:—** ... | | 22,19,419 2 9 |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments (out of those, securities of the face value of Rs. 20,25,000/- are with Banks against overcraft arrangements) ... | 22,06,869 2 0 | |
| (Average market value Rs. 20,02,906-2-0) | | |
| (ii) Ordinary Shares fully paid up ... | 12,550 0 0 | |
| (Realisable value Rs. 12,550/-) | | |
| (iii) Debentures or Bonds ... | 0 0 0 | |
| (iv) Other Investments ... | 0 0 0 | |
| (v) Gold ... | 0 0 0 | |
| (Investments which have no market quotations have been shown at their realisable value) | 22,19,419 2 0 | |
| **5. Advances:—** ... | | 28,33,957 0 3 |
| (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors.) Particulars as per Schedule | | |
| Loans: Cash Credits, Overdrafts, etc. | | |
| (i) In India ... | 28,23,772 9 6 | |
| (ii) Outside India ... | 0 0 0 | |
| | 28,23,772 9 6 | |
| **Bills Discounted and Purchased** (excluding Treasury Bills of Central & State Governments):— | | |
| (i) Payable in India ... | 10,184 6 9 | |
| (ii) Payable outside India ... | 0 0 0 | |
| | 28,33,957 0 3 | |
| **6. Bills Receivable (being bills for collection as per contra):—** | | |
| (i) Payable in India ... | 58,460 5 0 | |
| (ii) Payable outside India ... | 0 0 0 | 58,460 5 0 |
| **7. Constituents Liabilities for Acceptances, Endorsements, and other obligations as per contra** | | 0 0 0 |
| **8. Premises:—** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 25,013 14 0 | |
| Less: Total depreciation written off ... | 7,665 14 0 | 17,348 0 0 |
| **9. Furniture and Fixture** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 40,891 9 9 | |
| Additions during the year ... | 72 8 0 | |
| | 40,964 1 9 | |
| Less: Sales during the year ... | 0 0 0 | |
| | 40,964 1 9 | 21,795 12 0 |
| Less: Total depreciation written off ... | 19,168 5 9 | |
| Carried Over ... | | 57,23,242 14 3 |

# The Presidency Industrial

## Profit and Loss Account for the year ended 31st December 1956

| EXPENDITURE | Rs. as. ps. | Rs. as. ps. |
|---|---|---|
| 1. Interest paid on deposits and borrowings, etc. ... | | 1,34,338 13 2 |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund (including Salary and allowances paid to Managing Director Rs. 2125, Paid to Director Rs. 6,000 and paid to Manager Rs. 7,625) ... | | 85,550 13 6 |
| 3. Directors' and Local Committee Member's Fees 0-0-0 Allowances (Travelling expenses) 1703-0-0 | | 1,703 0 0 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 4,967 2 3 |
| 5. Law charges ... | | 4,740 14 6 |
| 6. Postage, Telegrams and Stamps ... | | 1,650 6 3 |
| 7. Auditor's fees ... | | 1,200 0 0 |
| 8. Depreciation on and Repairs to Banking Company's Property | | 6,581 11 9 |
| 9. Stationery, Printing, Advertiesment, etc. ... | | 6,071 1 0 |
| 10. Loss from sale of or dealing with Non-Banking Assets ... | | 1,634 4 3 |
| 11. Other expenditure ... | | 9,095 9 9 |
| 12. Balance of Profit ... | | 0 0 0 |
| Total Rs. ... | | 2,57,533 13 5 |

| INCOME | Rs. as. ps. | Rs. as. ps. |
|---|---|---|
| (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary Provisions) | | |
| 1. Interest and Discount ... | | 2,23,213 11 4 |
| 2. Commission, Exchange and Brokerage ... | | 9,043 13 1 |
| 3. Rent ... | | 3ɔ0 0 0 |
| 4. Net Profit on sale of Investments, Gold, Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or account) ... | | 0 0 0 |
| 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold or Silver, Land Premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account.) ... | | 0 0 0 |
| 6. Income from Non-Banking Assets and Profit from Sale of or dealing with such Assets. ... | | 3,7ɔ8 0 0 |
| 7. Other Receipts ... | | 64 4 0 |
| 8. Loss ... | | 21,144 1 0 |
| Total Rs. ... | | 2,57,533 13 5 |

| | | | |
|---|---|---|---|
| C. G. Joshi<br>Accountant.<br>(M/s G. U. Chitale and V. G. Gangal being out of Station, did not sign.) | G. D. Joglekar<br>Manager. | G. R. Sathe Chairman.<br>D. G. Bapat Vice-Chairman. | C. T. Chitale<br>W. P. Vaidya<br>L. R. Dhadphale<br>V. G. Herekar } Directors. |

## AUDITOR'S REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Presidency Industrial Bank, Ltd. Poona, as at 31st December 1956 and also the annexed Profit and Loss account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the returns of the Bombay Branch audited by us.

In accordance with the provisions of section 29 of the Banking Act, 1949, read with the provisions to sub-section (1) and (2) of section 211, and sub-section (5) of section 211 and section 227 (5) of the Companies Act. 1956 the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the sixth Schedule of the Companies Act 1956. The accounts are, therefore, drawn up in conformity with Forms A & B of the third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that:—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have faund them to be satisfactory.

(b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank.

(c) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Bombay Branch of the Bank.

(d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss account dealt with by this Report are in agreement with the books of accounts and the returns.

(e) In our opinion, and to the best of our information and according to the explanation given to us, the said accounts give the information required by the Companies Act. 1956, in the manner so required for Banking Companies and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1956 and the Profit and Loss account gives a true and fair view of the loss for the year ended upon that date.

POONA CITY,<br>10th May 1957.

B. C. Abhyankar & Co.,<br>Chartered Accountants.

# Bank, Limited Poona 2

**Balance Sheet** (*Continued*)

| PROPERTY AND ASSETS | | Rs. as. ps. | Rs. as. ps. |
|---|---|---|---|
| Brought Forward ... | | | 57,23,242 14 3 |
| **10. Other Assets including Silver** | | | 1,41,593 5 9 |
| (1) Interest accrued on Investments ... | | 20,570 4 0 | |
| (2) Printing and Stationery on hand ... | | 17,260 0 0 | |
| (3) Deposit with Telephone and Electric Co. ... | | 1,806 0 0 | |
| (4) Income-tax paid in advance and at source ... | | 59,858 5 0 | |
| (5) Legal Expenses pending adjustments ... | | 16,700 15 11 | |
| (6) Stamps on hand ... | | 316 8 0 | |
| (7) Balance in Current Accounts with Co-operative Banks | | 8,123 0 4 | |
| (8) Advances ... | | 200 0 0 | |
| (9) Outstanding debtors ... | | 1,302 0 0 | |
| (10) Refund of Income-tax due ... | | 10,368 2 0 | |
| (11) Branch adjustments ... | | 2,298 2 6 | |
| (12) Guarantee under letter of credit ... | | 2,790 0 0 | |
| | | 1,41,593 5 9 | |
| **11. Non-Banking Assets acquired in satisfaction of Claims** ... | | | 76,360 0 0 |
| **12. Profit and Loss Account** | | 60,269 4 6 | |
| Balance as per last Balance Sheet ... | | | |
| Less: Appropriations ... | | | |
| (1) Reserve Fund ... | 12,000 | | |
| (2) Provision for Income-tax ... | 25,000 | | |
| (3) Reserve for Invesments ... | 7,500 | 59,500 0 0 | |
| (4) Reserve for Bad and Doubtful debts ... | 15,000 | | |
| | | 769 4 6 | |
| Less: Loss for the year as per annexed statement ... | | 21,144 1 0 | 20,374 12 6 |
| Total Rs. ... | | | 59,61,571 0 6 |

## SCHEDULE

Referred to in the Balance Sheet

| Particulars | Loans, Advances, Cash Credits & Overdrafts | Bills Discounted & Purchased |
|---|---|---|
| 1. Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 15,78,653 12 0 | 10,184 6 9 |
| 2. Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 10,40,456 8 1 | 0 0 0 |
| 3. Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 8,883 10 6 | 0 0 0 |
| 4. Debts considered doubtful or bad not provided for ... | 1,95,778 10 11 | |
| Total Rs. ... | 28,23,772 9 6 | 10,184 6 9 |
| 5. Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 3,299 11 7 | 0 0 0 |
| 6. Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of Private Companies as Members ... | 0 0 0 | 0 0 0 |
| 7. Maximum total amount of advances including temporary advances made at any time during the year to Directors, or Managers, or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 8,583 10 7 | 0 0 0 |
| 8. Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of Private Companies as Members ... | 83,045 8 3 | 0 0 0 |
| 9. Due from Banking Companies ... | 0 0 0 | 0 0 0 |

**B. C. Abhyankar & Co.,**
Chartered Accountants.

( पृष्ठ २०६ वरून चालू )

संबंध वाढला, त्यामुळें त्यांना हिंदी माल मागवून विकण्याची कल्पना माझ्या मनांत आली; व १९२४ सालच्या प्रारंभापासून मुंबईचे व्यापारी कै. सामंत यांच्याकडून गालिचे, बनारसी स्कार्फ, हरणाची कातडीं, मण्यांच्या माळा, आंब्याचा रस, वगैरे वस्तु मागवून त्या विकावयाला मी सुरवात केली. हाच खरोखरी माझ्या व्यापारी जीवनाचा आरंभ म्हटला पाहिजे !

अंकविक्रीच्या बाबतींतील एक गोष्ट सांगण्यासारखी आहे, १९२५ सालीं एम्. ए. चा अभ्यास संपत आलेला असतांना, फिलाडेल्फिया येथें भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत काम करण्याची संधि मिळाल्यामुळें, मी ऐन परीक्षेच्या वेळीं कॉलेज सोडून तेथें गेलों. जातांना मी 'ऑब्झर्वर' चे संपादक प. वा. डॅनियल्स यांना अशी विनंती केली कीं, माझ्याकडे असलेलें अंकविक्रीचें काम त्यांनीं हिंदी विद्यार्थ्यालाच द्यावें. त्याचप्रमाणें माझ्या मागाहून पुण्याचे कै. करंदीकर आणि नागपूरचे कै. जीवतोंडे या दोघां विद्यार्थ्यांना हें काम मिळालें. पुढें ही परंपरा तुटली, हा भाग वेगळा !

### प्रथम भागीदार, नंतर मालक

१९२५ सालच्या जूनमध्यें फिलाडाल्फिया येथें जंगी औद्योगिक प्रदर्शन, दीड शतकांतील औद्योगिक प्रगतीची कल्पना देणारें ( Sesqui Centinental )–फार मोठ्या प्रमाणावर भरलें होतें. त्या प्रदर्शनांतील आपला 'इंडिया आर्ट शॉप' हा स्टॉल सांभाळण्यासाठी न्यूयॉर्कचे हिंदी व्यापारी कै. भारतसिंग वर्मा यांनीं मला बोलावलें. व्यापारी जीवनांत मोठ्या प्रमाणावर जबाबदारीनें भाग घेण्याची जी ही संधि मला मिळाली, ती पुढें माझ्या प्रगतीला कारण झाली. प्रदर्शन संपल्यावर कै. वर्मा यांच्या न्यूयॉर्क येथील दुकानांतहि मी आणखी सहा महिने काम केलें. अर्थात् माझा एम. ए. होण्याचा संकल्प, शिष्यवृत्ति मिळूनहि या व्यापारी प्रवृत्तीमुळें सिद्धीस गेला नाहीं ! कै. भारतसिंग यांच्याकडे मी काम करीत असतांनाच न्यूयॉर्क येथें ठोक व्यापार करीत असलेले जयपूरचे व्यापारी श्री. ईश्वरलाल सोगानी यांनीं १९२७ सालच्या मार्चमध्यें मला भागीदार म्हणून आपल्याबरोबर काम करावयाला बोलविलें. श्री. सोगानी यांनीं आपलें हें दुकान १९३१ सालच्या सुरुवातीला श्री. नानकचंद शहाणी यांना विकलें; व दोन महिन्यांच्या आंतच श्री. शहाणी यांच्याकडून मी तें ४५०० डॉलरांना विकत घेतलें. त्यामुळें 'सोगानी अँड कंपनी' असें आमच्या दुकानचें नांव आहे. आज आमच्या दुकानांचा वार्षिक खर्च २५,००० डॉलर आहे. मी दर वर्षीं २०० डॉलर बोनस माझ्या नोकरांना देतों; व विशेष फायदा झाला, तर ५०० डॉलरपर्यंतहि तो वाढवतों. माझा हा व्याप सांभाळून हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या संस्थांना मी आतांपर्यंत २०,००० रुपयांपर्यंत मदत केलेली आहे, व येथें कोणीहि परराष्ट्रीय मनुष्य आला, तर त्याला शक्य तें साहाय्य करणें हें मी आपलें कर्तव्य समजतों."

( अपूर्ण ) —"तरुण भारत" वरून

**चीन व पश्चिम जर्मनी ह्यांचा व्यापार**—चीनशीं करावयाच्या व्यापारावरील बंधनें ब्रिटननें ढिलीं केलीं आहेत. त्याचप्रमाणें पश्चिम जर्मनीचें सरकारहि हीं बंधनें सैल करणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. पश्चिम जर्मनींतील उद्योगधंद्यांना चीनची बाजारपेठ पाहिजे आहे.


खर्चांत बचत करा व पैसा शिलकीत टाका
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
जनता बचत योजना
व्याज : २½ टक्के

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकावू.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.